## रे.दि.मु. २००/२०२१ मध्ये नि. क्र. २९ खालील आदेश
## (महावीर वि. संजय व इतर)

प्रतिवादी क्र. २ याने सदरचा अर्ज त्याचेविरुद्ध निशाणी ०५ कडील तूर्तातूर्त ताकीद अर्जावर 'युक्तिवाद नाही' असा दिनांक २४/११/२०२३ रोजी झालेला आदेश रद्दबातल होऊन मिळणे करिता दाखल केले आहे. वादीने प्रस्तुत अर्जाचे पाठीमागील बाजूस त्याचे म्हणणे दाखल केले आहे.

प्रस्तुत अर्जातील वादीचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुत प्रतिवादीचे वकील नेमले तारखेस परगावी गेले होते. त्यामुळे त्यांना युक्तिवाद करणे शक्य झालेले नाही. सदर विलंब हा जाणीवपूर्वक केलेला नाही. प्रस्तुत प्रतिवादीचे वतीने युक्तिवाद ऐकून घेतल्यास न्यायदानास मदत होणार आहे. सदर प्रतिवादीचे युक्तिवाद न ऐकून घेतल्यास त्याचेवर अन्याय होणार आहे. सबब, युक्तिवाद नाहीचा आदेश बाजूला सारून युक्तिवाद करण्यास परवानगी असावी अशी विनंती प्रस्तुत प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे.

२) वादीचे प्रतिकथन असे की, प्रस्तुत कामी प्रतिवादीस बऱ्याच वेळा संधी देऊनही त्याने निशाणी क्र. ५ वर युक्तिवाद केला नाही. प्रतिवादी हे जाणूनबुजून कामकाज लांबविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज नामंजूर करावा. यदाकदाचित मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आल्यास त्यांना योग्य तो दंड आकारण्यात यावा.

३) अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. संचिकेचे व सोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला.

४) प्रकरण संचिकेचे अवलोकन केले असता वादीने सदरचा दावा प्रतिवादींविरुद्ध करारपत्राप्रमाणे खरेदीपत्र पूर्ण होऊन मिळण्याकरिता व जाहीरनामेकरिता दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणात वादीने निशाणी क्र. ५ वर लेखी युक्तिवाद निशाणी

क्र. २८ कडे दि. ०६/०४/२०२३ रोजी सादर केले आहे. त्यानंतर प्रतिवादीचे वकील गैरहजर राहिल्यामुळे प्रतिवादींविरुद्ध अर्जात नमूद केल्याप्रमाणे आदेश पारित केला आहे. सदरचा आदेश रद्दबातल करण्याची मागणी प्रतिवादी क्र. २ याने केली आहे. या सर्व बाबींचा प्रकरणातील परस्पर विरोधी कथनांचे पार्श्वभूमीवर विचार केला असता वादीचा सदरचा दावा हा स्थावर मिळकतीतील हक्क व हित संबंधाबाबत असल्याने दावा अंतिमतः गुणदोषावर निकाली करण्यासाठी आवश्यक आहे. तसे न झाल्यास प्रकरणात निष्कारण गुंतागुंत होऊन प्रकरणांची अनेकता होण्याची दाट शक्यता आहे. त्याकरिता निशाणी क्र. ०५ कडील अर्ज गुणदोषावर निकाली करण्यासाठी प्रस्तुत प्रतिवादीचे विधिज्ञांना त्यावर युक्तिवाद करण्याची संधी दिल्यास ते न्यायप्रक्रीयेस व नैसर्गिक न्यायतत्त्वास सुसंगत ठरेल. प्रकरणातील सारासार तथ्यांचा विचार केला असता प्रस्तुतचा अर्ज प्रस्तुत प्रतिवादीने वादीला खर्चाची रक्कम म्हणून रूपये ३००/– देण्याचे आदेशीत केल्यास न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. या सर्व कारणांचा विचार करून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ याने वादीला एकूण खर्चाची रक्कम रु. ३००/– देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र. २ याने वादीस खर्चाची रक्कम अदा केल्यानंतर त्यांचे विरुद्ध निशाणी क्र. ०५ चे तूर्तातूर्त ताकीद अर्जावर 'युक्तिवाद नाही' असा दि. २४/११/२०२३ रोजी झालेला आदेश रद्दबातल करण्यात यावा.

३. अनुषंगिक आदेश अर्ज नि. क्र. ०५ वर पारित करण्यात यावा.

PRAKASH CHUNNI BACHHALE
Digitally signed by PRAKASH CHUNNI BACHHALE
Date: 2024.08.28 16:15:08 +0530

स्थळः– जत (प्रकाश सी. बछले)

दि. २८/०८/२०२४ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, जत